# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**<u>दिनांक 12.11.2012 (का.प.क्र.18) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.</u>**

सोमवार दिनांक 12.11.2012 (का.प.क्र.18) रोजी मा.सभापती श्री.विकास रतनलाल जैन यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे सकाळी 11.30 वाजता वंदेमातरम् या गिताने सुरू झाली सभेला मा.प्र.आयुक्त तथा शहर अभियंता श्री.एम.डी.सोनवणे, प्र.नगर सचिव तथा उपआयुक्त (प्रशासन) श्री.रविंद्र निकम यांचेसह संबधीत अधिकारी तसेच खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

01. स. श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
02. स. श्री. हाळनोर गिरजाराम नानाराव
03. स. श्री.मुंडे बाळासाहेब दिनकर
04. स. श्रीमती राजपुत प्राजक्ता विश्वनाथ
05. स. श्रीमती घडमोडे सविता भगवान
06. स. श्री.कुचे नारायण तिलोकचंद
07. स. श्री.शेख अब्दुल असद शेख अब्दुल रशीद
08. स. श्री. खान अक्रम करीम खान
09. स. श्री.जाधव विजेंद्र मुरलीधर

**<u>चर्चा :</u>**

| | |
|---|---|
| मा.सभापती | :सर्व स.सदस्य अधिकारी, कर्मचारी आणि पत्रकार यांना स्थायी समितीतर्फे दिवाळीच्या व नविन वर्षाच्या शुभेच्छा व्यक्त करण्यात येतात. |
| श्री.नारायण कुचे | :दिवाळी असल्याकारणाने शहरातील सर्व लाईट दुरूस्त करण्यात यावे. चालु करण्यात यावे. |
| श्री.बाळासाहेब मुंडे | :दिवाळी सणानिमित्त शहरात पाणी पुरवठा पुरेशा प्रमाणात व वेळेवर सोडण्यात यावे. लाईट, साफसफाई याकडे विशेषतः लक्ष देण्यात यावे. दिवाळीनिमित्त सर्वांना सुभेच्छा. |
| मा.सभापती | :सणांचे दिवस असल्याने या बाबतीत साफसफाई, विद्युत, पाणीपुरवठा याकडे विशेषतः लक्ष देण्यात यावे. संबधीत अधिकारी यांनी शहरामध्ये राऊंड मारण्यात येवुन वरील बाबींचा आढावा घेण्यात येवुन चांगल्याप्रकारच्या सोई उपलब्ध करून देण्यात याव्या. मागील बैठकीत शिलाई मशिनबाबत निर्णय घेण्यासाठी सांगीतले होते त्याबाबतीत काय निणर्य घेतलेला आहे. खुलासा करण्यात यावा. |
| शहर अभियंता | :चौकशी समितीने शिलाई मशिनबाबतचा अहवाल मा.आयुक्तांकडे दाखल केलेला आहे. शिलाई मशिनचे वाटप लवकरच होईल. |
| श्री.गिरजाराम हळनोर | :महानगरपालिकेचा व नागरीकांच्या हिताचा निर्णय घेण्यात यावा. दिवाळी सण असल्याने भाऊबिजीची भेट म्हणुन शिलाई |

मशिन वाटप करण्यात यावे. बिओटी कक्ष प्रमुख यांना शहानुरवाडी मॉलच्या पार्कींगबाबतीत व आजच्या परिस्थितीबाबत विचारणा केली होती. परंतु मला गोलमाल उत्तर देण्यात आले आहे. परमिशनमध्ये कुठे पार्कींगची जागा दिली होती. त्याचे उत्तर दिलेले आहे. संबधीत अधिकारी यांनी माझ यासोबत पहाणीसाठी यावे. त्यानंतर प्रश्नाचे उत्तर देण्यात यावे.

**मा.सभापती** :संबधीत अधिकारी यांनी स.सदस्य श्री.गिरजाराम हाळनोर यांचे सोबत सदरील जागेची पहाणी करावी.

**श्री.नारायण कुचे** :दिवाळी सन असल्यामुळे आजची सभा तहकूब करण्यात यावी. येणाऱ्या सभेमध्ये विषय घेण्यात यावे.

**श्री.शेख अब्दुल असद** :विषय पत्रिकेवरील विषय घेण्यात यावे.

**विषय क्र. 89 :** (विषय क्र. 81 पुढील सभेत ठेवण्याबाबत दि. 08/11/2012 रोजीच्या सभेतील निर्णयाप्रमाणे)

दिनांक 21/02/2011 (का.प.क्र.12), 14/03/2011 (का.प.क्र.13), 21/03/2011 (का.प.क्र.14), 22/03/2011 (का.प.क्र.15), 13/04/2011 व 15/04/2011 (दि.13/04/2011 ची तहकुब सभा) (का.प.क्र.16) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभांचे इतिवृत्त कायम करणे.

टिप : (इतिवृत्तांताच्या प्रती यापूर्वीच सर्व संबंधीतांना वितरीत करण्यांत आलेल्या आहेत.)

**मा.सभापती** : विषय स्थगीत करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव स्थगित ठेवण्यांत यावा, असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. 90 :** (विषय क्र. 82 पुढील सभेत ठेवण्याबाबत दि. 08/11/2012 रोजीच्या सभेतील निर्णयाप्रमाणे)

दिनांक 27/07/2012 (का.प.क्र.7), 03/08/2012 (का.प.क्र.8), 10/08/2012 (का.प.क्र.9), 21/08/2012 (का.प.क्र.10), 28/08/2012 (दि.21/08/2012 ची तहकुब सभा) (का.प.क्र.10), 28/08/2012 (का.प.क्र.11) व 07/09/2012 (का.प.क्र.12) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभांचे इतिवृत्त कायम करणे.

टिप : (इतिवृत्तांताच्या प्रती यापूर्वीच सर्व संबंधीतांना वितरीत करण्यांत आलेल्या आहेत.)

**मा.सभापती** : विषय स्थगीत करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तुत प्रस्ताव स्थगित ठेवण्यांत यावा, असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. 91 :**

मा.स्थायी समितीसमोर प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मोहल्ला पदमपुरा येथील महानगरपालिकेच्या मालकीचे व ताब्यातील जय टॉवरजवळ व्यापारी संकुलातील दुकान गाळा क्र.(2) संबंधाने अर्जदार श्री.आर.बी.मुळे यांनी विनंती केली आहे. सदर दुकानाचे क्षेत्र 12.20 चौ.मी. एवढे आहे. सदर दुकान यापूर्वी लिलावाने देण्यात आलेल्या व्यक्तीने ताब्यात घेतली नसल्याने सदर दुकान रिक्त आहे. सदर गाळयांचे भाडे रू.2700/- प्रतिमाह एवढे होते. याशिवाय मालमत्ता कर, इतर कर तसेच सेवा शुल्क इत्यादीसह नेहमीच्या अटी शर्ती लागू राहतील. करीता मागणीनुसार सदर दुकानाकरीता भाडे रू.2700/- प्रतिमाह निश्चित करून नेहमीच्या इतर अटी/शर्तीस अधीन राहून सदर दुकान भाडे तत्वावर तीन वर्षाचे कालावधी करीता देण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**मा.सभापती** : विषय क्र. 91 ते 94 मंजुर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पदमपुरा येथील महानगरपालिकेच्या मालकीचे व ताब्यातील जय टॉवरजवळ व्यापारी संकुलातील दुकान गाळा क्र.(2) मागणीनुसार सदर दुकानाकरीता भाडे रू.2700/- प्रतिमाह आकारणी करून इतर अटी/शर्तीस अधीन राहून सदर दुकान तीन वर्षाचे कालावधीसाठी श्री.आर.बी.मुळे यांना भाडे तत्वावर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

<u>विषय क्र. 92 :</u>

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मोहल्ला सिडको, एन-5, वीर सावरकर नगर येथील सभागृह भाडे तत्वावर मिळणे बाबत न्यु पावर व्यायाम क्रिडा असोसिएशन, औरंगाबाद यांनी स्नुकर (बिलीयर्डस्) या खेळासाठी व नवयुवकांना या खेळाचे प्रशिक्षण देण्यासाठी भाडे तत्वावर देण्यात यावा म्हणुन मागणी केलेली आहे. सदरील सभागृह सिडकोने हस्तांतरीत केलेल्या खुल्या जागेतील असून सदरच्या सभागृहाचे क्षेत्रफळ 90.95 चौ.मी. एवढे आहे. सदर हॉल सध्या रिक्त आहे. यासाठी चालू वर्षाच्या सिध्द शिघ्र गणकानुसार रू.7,500/- प्रतिमाह प्रमाणे भाडे आकारणी करण्यासह अनामत रक्कम, सेवाशुल्क, सेवाकर भरणा करण्यासह महानगरपालिकेच्या नेहमीच्या इतर अटी शर्तीनुसार सदर सभागृह सध्या एक वर्षासाठी भाडे तत्वावर देणे बाबत प्रशासकीय मान्यता झालेली आहे. संस्थेची मागणी संबंधाने प्रस्तावितानुसार संस्थेस उक्त सभागृह भाडे रू.7,500/- प्रतिमाहने एक वर्षाचे कालावधीकरीता भाडे तत्वावर देण्याचा प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

<u>ठराव :</u>

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सिडको, एन-5, वीर सावरकरनगर येथील सभागृह न्यु पावर व्यायाम क्रिडा असोसिएशन, औरंगाबाद यांनी स्नुकर (बिलीयर्डस्) या खेळासाठी व नवयुवकांना या खेळाचे प्रशिक्षण देण्यासाठी रक्कम रू.7,500/- प्रतिमाह प्रमाणे भाडे आकारणी करून महानगरपालिकेच्या नेहमीच्या इतर अटी शर्तीनुसार सदर सभागृह तुर्त एक वर्षाचे कालावधीकरीता भाडे तत्वावर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

<u>विषय क्र. 93 :</u>

मा.स्थायी समितीसमोर प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मोहल्ला संजयनगर येथील महानगरपालिकेच्या मालकीचे व ताब्यातील संजयनगर व्यापारी संकुलातील दुकान गाळा क्र. (6) संबंधाने अर्जदार श्री.शेख अमजद शेख अहमद यांनी विनंती केली आहे. सदर दुकानाचे क्षेत्र 6.3 चौ.मी. एवढे आहे. सदर दुकान यापुर्वी लिलावाने देण्यात आलेल्या व्यक्तीने ताब्यात घेतली नसल्याने सदर दुकान रिक्त आहे. सदर गाळयांचे मासिक भाडे शिघ्र गणकाआधारे रू.1,115/- एवढे होते. याशिवाय मालमत्ता कर, इतर कर तसेच सेवा शुल्क इत्यादीसह नेहमीच्या अटी शर्ती लागू राहतील. करीता अर्जदार श्री.शेख अमजद शेख अहमद यांचे मागणीनुसार सदर दुकानाकरीता भाडे रू.1,115/- प्रतिमाह निश्चित करून नेहमीच्या इतर अटी/शर्तीस अधीन राहून सदर दुकान तीन वर्षाचे कालावधी करीता भाडे तत्वावर देण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

मा.सभापती : संजयनगर येथील इतर दुकानांना कमी भाडे आकारण्यांत आलेले आहे. त्यामुळे या दुकानास भाडे कमी करण्याबाबत संबंधीताने विनंती केलेली आहे. त्यानुसार प्रस्तावित भाडे दराच्या 50% आकारणी करून देण्यांत यावे.

<u>ठराव :</u>

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मोहल्ला संजयनगर येथील महानगरपालिकेच्या मालकीचे व ताब्यातील संजयनगर व्यापारी संकुलातील दुकान गाळा क्र. (6) संबंधाने अर्जदार श्री.शेख अमजद शेख अहमद यांना प्रस्तावित भाडे दराच्या 50% आकारणी करून व नेहमीच्या इतर अटी/शर्तीस अधीन राहून सदर दुकान तीन वर्षाचे कालावधी करीता भाडे तत्वावर देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

<u>विषय क्र. 94 :</u>

कार्यकारी अभियंता (वार्ड ब आणि क) यांनी प्रस्ताव सादर करीत आहे की, वार्ड क्र.25 सिडको एन-7 येथील G-2, G-1 ते सेक्टर "F" पर्यंतच्या रस्त्यावर Tre-Mix Concrete पेव्हींग करणे. या कामाचे सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन 2011-2012 च्या दरसुची नुसार अं.प. रक्कम रू.39,97,100/- चे तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च सन 2012-13 या आर्थिक वर्षात नविन कॉंक्रीट रस्ते शहरी भाग या लेखाशिर्षा मधुन करण्यात येईल. सदर अंदाजपत्रकास मा.आयुक्त महोदय, यांची मान्यता होऊन मा.स्थायी समिती समोर प्रस्ताव सादर करणेसाठी शिफारस केली आहे.

तरी अं.प. र.रू.39,97,100/- चे अंदाजपत्रकीय प्रस्ताव मा.स्थायी समितीसमोर मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.25 सिडको एन-7 येथील G-2, G-1 ते सेक्टर "F" पर्यंतच्या रस्त्यावर Tre-Mix Concrete पेव्हींग करणेच्या कामासाठी तयार करण्यांत आलेले रक्कम रू.39,97,100/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 95 :**

मा.स्थायी समितीसमोर प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या मालकी हक्कात असलेल्या खाली नमूद इमारतीतील महानगरपालिकेकडून चालविण्यात येणारे दवाखाने,

01. बन्सीलालनगर येथील प्राथमिक आरोग्य केंद्र.
02. कटकट गेट येथील प्राथमिक आरोग्य केंद्र.

विश्वस्त, वोखार्ड फांऊडेशन यांनी चालविण्यासाठी स्वारस्थ दाखवून सदर दवाखाने 5 वर्षाचे कालावधी करीता देण्याची मागणी केली आहे. सदर संस्था स्थानिक नागरीकांच्या सुखसोई/सुविधाच्या दृष्टीने सध्याची आवश्यकता गरज या संबंधाने सदर दवाखान्याचे आधुनिकिकरण करून दवाखाना/जागा वापर करणार आहे.

उक्त संस्थेचा सेवाभावी व सामाजिक उपक्रम विचारात घेता सदर दवाखान्यासाठी महानगरपालिकेच्या मालकी हक्कातील उक्त जागा /दवाखाने या वर्षीच्या सिध्द शिघ्र गणकाच्या दराआधारे निश्चित होणाऱ्या मासिक भाडे दराने भाडे तत्वावर देण्याचे प्रस्तावित आहे. बन्सीलालनगर व कटकटगेट या भागातील जमिनीचे या वर्षीचे सिध्द शिघ्र गणकाचे दर व बांधकाम खर्च दराआधारे भाडे आकारणी करता,

01. बन्सीलालनगर येथील दवाखान्यासाठीचे मासिक भाडे रक्कम रू.140/- प्रति चौ.मी.
02. कटकट गेट येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे मासिक भाडे रक्कम रू.130/- प्रति चौ.मी. एवढे होते.

सदर संस्थेची मागणी, स्थानिक नागरीकांना उपलब्ध होणाऱ्या आधुनिक वैद्यकीय सुविधा इत्यादी विचारात घेता सदर संस्थेस वर नमुद दवाखाने,

01. बन्सीलालनगर येथील दवाखान्यासाठीचे मासिक भाडे रक्कम रू.140/- प्रति चौ.मी. व
02. कटकट गेट येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे मासिक भाडे रक्कम रू.130/- प्रति चौ.मी. या मासिक भाडे दराने प्रत्यक्षात वापरातील बांधकाम क्षेत्र या आधारे एकूण भाडे आकारून 5 वर्षाकरीता भाडे तत्वावर देण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर. उक्त भाडे दराशिवाय इतर कर, सेवाकर व इतर अटी/शर्ती वेगळ्या राहतील.

**संवाद :**

| | |
|---|---|
| मा.सभापती | :प्रशासनाने पत्र देवुन विनंती केलेली आहे की, सदरील विषय धोरणात्मक असल्याने मा.सर्वसाधारण सभेची मंजूरी घ्यावयाची आहे. |
| श्री.गिरजाराम हाळनोर | :सदरील विषय धोरणात्मक स्वरूपाचा आहे. आजपर्यंत मनपाचे कुठलेही दवाखाने खाजगी तत्वावर चालविण्यास दिलेले नाही. ते द्यायचे असेल तर हा धोरणात्मक निर्णय मा.सर्वसाधारण सभेकडे जाईल त्यानंतर स्थायी समितीमध्ये त्यामध्ये अटी शर्ती रेट बाबत निर्णय घेण्याचा विषय स्थायी समितीचा आहे. अधिकाऱ्यांनी अशा प्रकारचे विषय या सभागृहापुढे आणु नये. |
| मा.सभापती | :प्रशासनाने दिलेल्या पत्रानुसार सदर विषय येणाऱ्या मा.सर्वसाधारण सभेकडे पाठविण्यात येतो. |

**ठराव :**

**प्रस्तुत प्रस्तावासंदर्भात प्रशासनाने दिलेल्या पत्रानुसार सदरील विषय येणाऱ्या मा.सर्वसाधारण सभेकडे पाठविण्यात यावा, यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत आली.**

**ऐनवेळचे विषय**

**विषय क्र. 96 :**

**प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, तेराव्या वित्त आयोगाअंतर्गत क्रांती चौक ते एस.एस.सी.बोर्ड (इन्स्टीट्युट ऑफ इंजिनिर्स) व हॉटेल वेदांत (पटवर्धन हॉस्पीटल) ते रेल्वेस्टेशन या 40 मी. रूंद विकास योजना रस्त्याचे कॉंक्रेटीकरण व डांबरीकरण करणेच्या कामाचे सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन 2011-2012 च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. यास प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. तसेच महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण 2008/1338/ प्र.क्र.171/08/नवि/मंत्रालय, मुंबई-32 दिनांक 02 मार्च 2009 च्या परिपत्रकानुसार रक्कम रू.50.00 लक्षच्या वरील कामांवर देखरेखी करीता तृतीय पक्ष (Third Party) ची नेमणुक करणे आवश्यक असल्याने सदरील कामावर प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार समितीची नियुक्ती करणेसाठी निविदा मागविण्यात आल्या आहे. सदरील निविदांचे प्रथम लिफाफे (Envelop-A) उघडण्यात आले असता, एकुण 06 निविदा प्राप्त झाल्या, प्राप्त निविदांपैकी तांत्रिकदृष्ट्या पात्र 03 निविदांचे लिफाफे (Envelop-B) उघडण्यात आले असता त्यांचा तुलनात्मक तपशिल खालीलप्रमाणे आहे.**

| | | | |
|---|---|---|---|
| **01.** | **क्रिएशन इंजिनिअर्स प्रा.लि.पुणे** | **-** | **अंदाजपत्रकीय दराच्या 2.30% दराने (सेवा करासह)** |
| **02.** | **व्हॅपकोस लि.अहमदाबाद (GOI Undertaking)** | **-** | **अंदाजपत्रकीय दराच्या 2.44% दराने** |
| **03.** | **जगप्रयाग प्रा.लि. लातुर** | **-** | **अंदाजपत्रकीय दराच्या 2.72% दराने** |

**उपरोक्त मे.क्रिएशन इंजिनिअर्स प्रा.लि. पुणे, यांच्या 2.30% दरास प्रशासकीय मान्यता प्रदान करून मा.स्थायी समिती सभेची मान्यता घेणे बाबत शिफारस केली आहे.**

**करीता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार समिती मे.क्रिएशन इंजिनिअर्स प्रा. लि. पुणे, यांना अंदाजपत्रकीय रक्कमेवर 2.30% दराने (सेवा करासह) कंन्सल्टंसी फिस नुसार नेमणुक करावयाचा मंजुरीचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.**

**मा.सभापती : विषय मंजुर करण्यांत येतो.**

**ठराव :**

**प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, तेराव्या वित्त आयोगाअंतर्गत क्रांती चौक ते एस.एस.सी.बोर्ड (इन्स्टीट्युट ऑफ इंजिनिर्स) व हॉटेल वेदांत (पटवर्धन हॉस्पीटल) ते रेल्वेस्टेशन या 40 मी. रूंद विकास योजना रस्त्याचे कॉंक्रेटीकरण व डांबरीकरण करणेच्या कामातंर्गत सदरील कामावर प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार समितीची नियुक्ती करणेसाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक मे.क्रिएशन इंजिनिअर्स प्रा. लि. पुणे, यांची अंदाजपत्रकीय रक्कमेवर 2.30% दराने (सेवा करासह) कंन्सल्टंसी फिस नुसार नेमणुक करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.**

**श्री.गिरजाराम हाळनोर :येणाऱ्या सर्वसाधारण सभेमध्ये स.सदस्यांनी ठेवलेले आपत्कालिन हेडचेंजचा विषय घेण्यात यावे. याबाबतची दखल प्रशासनाने घ्यावी.**

**मा.सभापती :आजची सभा तहकूब करण्यात येते.**

**नगर सचिव,**

**महानगरपालिका औरंगाबाद.**